जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-17/2021
दिनांकः- 15.11.2021

## <u>स्थायी समितीच्या सभेची सूचना</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा <u>दिनांक 16.11.2021 रोजी सांयकाळी 05.00</u> वाजता **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित रहावे ही विनंती**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **(स. अजीतपालसिंघ संधु)** | **( गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ )** |
| **नगरसचिव,** | **सभापती,** |
| नांवाशमनपा, नांदेड. | **स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड. |

**प्रति,**
**श्री / श्रीमती -----------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं. 01**

प्रशाकीय व आर्थीक मान्यता आदेश क्रं. मनपा/भांडार वि/136/2021-22 दिनांक 03.09.2021 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या स्थायीपात्र कायमस्वरुपी चतुर्थश्रेणी कर्मचा-यांकरीता लागणारे रेणकोट खरेदी करण्याकरीता महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स लि. मुंबई यांचे दरपत्रक दिनांक 25.08.2021 यांनी सादर केलेले दराप्रमाणे रुपये 9,50,000/- (अक्षरी रुपये नऊ लक्ष पन्नास हजार चारशे फक्त) यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये प्राप्त अधिकराानुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स लि. मुंबई यांच्याकडून खरेदी करण्याकरीता प्रशासकीय व आर्थीक मान्यता सदरील देण्याव्दारे देण्यात आलेली असुन त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्रं. 02**

**विषय** :- नावाशमनपा हद्दीतील झोन क्रं. 04 वजिराबाद अंतर्गत मलवाहीणीची वार्षीक देखभाल दुरुस्ती मागील वर्षीच्या कामात अतिरिक्त खर्चात वाढ करणे बाबत (AMRC 2020-21)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत मलवाहीणीची वार्षीक देखभाल दुरुस्ती करण्याकरीता एकूण 03 झोन कार्यान्वीत असुन शहरात एकूण 960.00 कि.मी. लांबीच्या मलवाहीण्या अस्तित्वात आहेत. दरवर्षी झोन निहाय मलवाहीण्याचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे काम करणे क्रमप्राप्त असून वार्षीक तत्वावर दैनंदिन देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी लागणा-या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रिया अंतिम करुन काम हाती घेण्यात येते. सन 2020-21 या वर्षासाठी वजिराबाद झोन अंतर्गत देखभाल दुरुस्तीसाठी एका वर्षाकरीता रुपये 22.19/- लक्षची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदरहु कामाची मुदत दिनांक 13.07.21 रोजी संपुष्टात आलेली आहे. त्याअनुषंगाने झोन क्रं. 04 व 05 अंतर्गत भुमीगत गटार लाईन देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेण्यात आलेली असुन एकूण रु. 22.49/- लक्ष रक्कमेची कामे पूर्ण झालेली आहे.

सध्या झोन क्रं. 04 व 05 मधुन भुमीगत गटार लाईनची देखभाल दुरुसतीची कामे करण्याकरीता नागरीक व स. सदस्य यांच्या कडून सतत मागणी होत आहे. तसेच बहुतांश भागात स्थळ पाहणी केली असता भुमीगत गटार लाईन खचून मलप्रवाह बंद होऊन रस्त्यावर वाहत आहे. तसेच बहुतांश चेंबर्स सुध्दा नादुरुस्त अवस्थेत आहेत. त्यास्तव सदर भागात देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेणे आवश्यक असल्याने तसेच नविन निविदा प्रक्रिया करुन अर्थसंकल्प मंजुर होणेसाठी अवधी लागणारा असल्याने तात्पुरत्या स्वरुपात रु. 10.00 लक्षची कामे काढून पुर्वीच्याच दराने संबंधीत कंत्राटदार **मे. पठाण मोईज अहेमद खान नांदेड** यांच्याकडून करुन घेणे योगय राहील.

सदरील कामासाठी वाढील खर्च रु. 10,00,000/- (अक्षरी रु. दहा लक्ष) एवढा अपेक्षीत असून सदरील कामे हाती घेण्याकरीता मा. आयुक्त महोदय यांची प्राथमिक मान्यता घेण्यात आलेली आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे सदरील कामावर लागणा-या अतिरीक्त वाढीव खर्च सालसन 2021-22 या आर्थीक वर्षात **मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती** या लेखा शिर्षकातून प्रशासकिय आर्थिक मान्यता प्रदान करण्याकरीता प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात येते.

**विषय क्रं. 03**

**विषय** :- **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. 09-क विष्णूनगर येथील मनपा शाळेच्या प्रांगणात बॉस्केट बॉल ग्राऊंड विकसीत करणे विधुत व्यवस्था करणे (वार्ड विकास निधी)**

संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/3848/2021 दि. 22.07.2021 (रुपये 29,99,300/-)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. 9-क विष्णूनगर येथील मनपा शाळेच्या प्रांगणात बॉस्केट बॉल ग्राऊंड विकसीत करणे विधुत व्यवस्था करण्यासाठी संदर्भीय आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार निविदा किमंत रुपये 26,42,067/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/4013 /2021 दिनांक 26.07.21 अन्वये दैनिक सामना विभागीय पातळी/दैनिक नगुशे उर्दु या वर्तमानपत्रातुन दिनांक 27.07.21 ई-निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा त्रिसदस्यी समिती समोर दिनांक 30.08.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | एस. एस. कन्सट्रक्शन, नांदेड | 13.00% जास्त दर |
| 02 | निलोफर कन्सट्रक्शन नांदेड | 21.00% जास्त दर |

निविदेच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमीदराची निविदा एस.एस. कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.00% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीत कंत्राटदार प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखी पत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.00% जास्त दरा ऐवजी 7.00% जास्त दराने करण्याचे लेखी सहमती दिली आहे. जे की, प्रचलीत जिल्हा दरसुची 2021-22 नुसार दर हे 0.10% कमी येत आहे.

करिता नावाशमनपा **हद्दीत प्रभाग क्रं. 9-क विष्णूनगर येथील मनपा शाळेच्या प्रांगणात बॉस्केट बॉल ग्राऊड विकसीत करणे विधुत व्यवस्था करणेसाठी एस.एस. कन्सट्रक्शन नांदेड** यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा 7.00% जास्त दर + GST या दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर कामासाठी रुपये 29,99,300/- यास अर्थसंकल्प 2021-22 मधील **वार्ड विकास निधी** या लेखा शिर्षकातुन काम हाती घेण्यास्तव प्रशासकीय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.

**विषय क्रं. 04**

**विषय :-** नावाशमनपाच्या विविध प्रभागातील पावर पंप दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविध प्रभागातील पावर पंप दैनंदिन दखभाल दुरुस्ती करणे (AMRC) करणे या कामासाठी ड नमुण्यात निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/पापुवजनि/4321/2021 दिनांक 02.08.2021 अन्वये मनपा नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आल्यानुसार लिफाफा क्रं. 02 (Price Bid) निविदा समिती समोर उघडले असता सर्वात कमी दर **ए.आर. इंजिनीअर्स नांदेड** यांचे आहेत संबंधीतांच्या दराची तुलना केली असता ते दर कमीचे आहेत. तरी संबंधीतास वासटाघाटीसाठी पाचारण केले असता सदरील दर वाटाघाटी अंती 2.97% ने कमी करुन दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

**नांवाशमनपा हद्दीत महापालिकेच्या विविध प्रभागात पावर पंप दैनंदीन देखभाल दुरूस्ती करणे बाबत.**

| SN | Discription | Item No. | Unit | Qty. | L1 Bidder A R Engineers Rates | Rates Collected from Local Market by Sona Machineries & Electrical Stores,Nanded | Rates Collected from Local Market by D/R Kishore Machinery Stores,Nanded | Negotiation Rates of A R Engineers (2.97% reduce) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Supplying and erecting **submersible pumpset of required HP with 230 V, 50 c/s AC supply suitable for 100 mm dia. borewell** suitable for 10 to 50 LPM discharge at 109 to 30 m head & (max. efficiency at 78 m head & 30 lpm) discharge & delivery pipe of necessary diameter with a necessary H type clamps as per specification No. **WP-SMP** | 1 | Each | 1 | 30718 | 33155 | 33882 | 29805.6754 |
| 2 | Supplying and erecting **D. O. L. Starter** suitable for 250V. **single phase,** 50 cycleswith overload element with necessarymaterials and connected to supply **upto 2 H.P.** | 2 | Each | 1 | 2690 | 2940 | 2969 | 2610.107 |
| 3 | Supplying and erecting **D.O.L. Starter** 400V. 3 phase, 50 cycles with no volt coil and overload element with necessary materials and connected to supply **upto 7.5 H.P.** (Similar to L & T make MK-1 DOL Model) | 3 | Each | 1 | 2910 | 3177 | 3208 | 2823.573 |
| 4 | Supplying and erecting **D.O.L. Starter** 400V. 3 phase, 50 cycles with no volt coil and overload element with necessary materials and connected to supply for **10 H.P.** (Similar to L & T make MN-16 DOL Model) | 4 | Each | 1 | 2980 | 3248 | 3280 | 2891.494 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | Supplying and erecting **flat flexible 3 core 1.5 sq mm** PVC sheathed submersible type **copper cable** suitably clamped at fixed intervals with column pipe assembly complete. | **5** | **Mtr.** | **1** | 110 | 315 | 318 | 106.733 |
| 6 | Supplying and erecting flat flexible 3 core 2.5 sq mm PVC sheathed submersible type copper cable suitably clamped at fixed intervals with column pipe assembly complete. | **6** | **Mtr.** | **1** | 161 | 320 | 323 | 156.2183 |
| 7 | Supplying and erecting flat flexible 3 core 4 sq mm PVC sheathed submersible type copper cable suitably clamped at fixed intervals with column pipe assembly complete. | **7** | **Mtr.** | **1** | 198 | 366 | 369 | 192.1194 |
| 8 | Supplying and erecting flat flexible 3 core 6 sq mm PVC sheathed submersible type copper cable suitably clamped at fixed intervals with column pipe assembly complete. | **8** | **Mtr.** | **1** | 278 | 395 | 398 | 269.7434 |
| 9 | Supplying and erecting **double pole metal /iron clad switch with fuse and neutral link 240V 16A** on **iron / G.I.** Frame / board as per specification No. **SW-SWR/MDP** | **9** | **Each** | **1** | 630 | 815 | 823 | 611.289 |
| 10 | Supplying and erecting double pole metal /iron clad switch with H.C. type fuse and neutral link 240V, 32A on iron / G.I. frame/board as per specification No. SW-SWR/MDP | **10** | **Each** | **1** | 1030 | 1175 | 1186 | 999.409 |
| 11 | Supplying and erecting Triple pole metal / iron clad switch & H.C. type fuse 415 / 500V 16A on iron / G.I. frame / board as per specification No. SW-SWR/MTP | **11** | **Each** | **1** | 1416 | 1690 | 1706 | 1373.9448 |
| 12 | Supplying and erecting Triple pole metal / iron clad switch & fuse 415 / 500V 32A on iron / G.I. frame / board as per specification No. SWSWR/ MTP | **12** | **Each** | **1** | 1601 | 1850 | 1868 | 1553.4503 |
| 13 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad switch and fuse 415 / 500V 63A on angle iron / G.I. frame as per specification No. SWSWR/ MTP | **13** | **Each** | **1** | 3137 | 3395 | 3428 | 3043.8311 |
| 14 | **Dismantling** the existing **submersible pump with GI pipeline** upto 10m depth. (For additional depth of each 3 m or part thereof add Rs.50/- per 3 m, in the rates) | **14** | **Each** | **1** | 2718 | 2980 | 3009 | 2637.2754 |
| 15 | **Rewinding of submersible pump motor in Borewell of all types and makes upto and including 5 HP** with coated copper wires & overhauling with minor repairs, lubricating of ball bearings & bush bearing, and replacing screws etc. testing for the original speed, H.P. and no load consumption & guarantee for one year. | **15** | **HP** | **1** | 2638 | 2895 | 2923 | 2559.6514 |
| 16 | **Rewinding of submersible pump motor in Borewell of all types and makes above 5 H.P. upto 25 H.P with coated copper wires & overhauling with minor repairs, lubricating of ball bearings & bush bearing, and replacing screws etc. testing for the original speed, H.P. and no load consumption & guarantee for one year** | **16** | **HP** | **1** | 2290 | 2510 | 2531 | 2221.987 |
| 17 | Supplying and erecting **No-Volt-Coil** similar to L&T make for motor having DOL starters of **MK-1 Type upto 7.5 H.P**. | **17** | **Each** | **1** | 385 | 500 | 505 | 373.5655 |
| 18 | Supplying and erecting **No-Volt-Coil** similar to L&T make for motor having DOL starters of **MU-1 Type from 7.5 H.P. to 10 H.P.** | **18** | **Each** | **1** | 674 | 810 | 818 | 653.9822 |
| 19 | Supplying and erecting **thermal Overload Relay** similar to L&T make for **MU** motor starter suitable for **up to 12.5 HP** | **19** | **Each** | **1** | 1497 | 1645 | 1661 | 1452.5391 |
| 20 | Supplying and erecting **thermal Overload Relay** similar to L&T make for **MK 1** motor starter suitable **for up to 15 HP** | **20** | **Each** | **1** | 909 | 1140 | 1151 | 882.0027 |
| 21 | Supplying & erecting **contactor MK-1** similar to L&T make for DOL motor starter **from 7.5 H.P. to 10 H.P.** | **21** | **Each** | **1** | 1187 | 1320 | 1333 | 1151.7461 |
| 22 | Supplying & erecting **contactor MU-1** similar to L&T make for DOL motor starter **from 7.5 H.P. to 10 H.P**. | **22** | **Each** | **1** | 1885 | 2090 | 2110 | 1829.0155 |
| 23 | **Dismantling** the existing **Submersible pump with PVC pipeline** | **23** | **Each** | **1** | 1500 | 1425 | 1439 | 1455.45 |
| 24 | Attending breakdown of water pump & accossiated anclires for fault finding includung minor repairs & put in working condition & submit the report of inspection to the engineer in-charge. | **24** | **Each** | **1** | 1500 | 1745 | 1762 | 1455.45 |
| 25 | Supplying and erecting **high density polythene pipe ISI mark 32 mm dia**. suitable for pressure of 6 kg/cm2 connected to Jet/Submersible pump with required material complete. | **25** | **Mtr.** | **1** | 107 | 238 | 240 | 103.8221 |
| 26 | Supplying and erecting **high density polythene pipe ISI mark 40 mm dia**. suitable for pressure of 6 kg/cm2 connected to Jet/Submersible pump with required material complete. | **26** | **Mtr.** | **1** | 131 | 321 | 324 | 127.1093 |

| MATERIAL RATES | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 27 | Supplying & Erecting GM Bush | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 720 | 845 | 853 | 698.616 |
| | 2 | | **HP** | **2** | 880 | 1020 | 1030 | 853.864 |
| | 3 | | **HP** | **3** | 717 | 910 | 919 | 695.7051 |
| | 5 | | **HP** | **5** | 1490 | 1645 | 1661 | 1445.747 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 1720 | 1955 | 1974 | 1668.916 |
| | 10 | | **HP** | **10** | 2200 | 2475 | 2499 | 2134.66 |
| 28 | Supplying & Ereecting Thurst Bearing | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 717 | 928 | 937 | 695.7051 |
| | 2 | | **HP** | **2** | 910 | 1078 | 1088 | 882.973 |
| | 3 | | **HP** | **3** | 1080 | 1220 | 1232 | 1047.924 |
| | 5 | | **HP** | **5** | 1405 | 1640 | 1656 | 1363.2715 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 1695 | 1856 | 1874 | 1644.6585 |
| | 10 | | **HP** | **10** | 2538 | 2765 | 2792 | 2462.6214 |
| 29 | Supplying & Erecting S/S Sluve | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 330 | 565 | 570 | 320.199 |
| | 2 | | **HP** | **2** | 390 | 545 | 550 | 378.417 |
| | 3 | | **HP** | **3** | 375 | 525 | 530 | 363.8625 |
| | 5 | | **HP** | **5** | 455 | 630 | 636 | 441.4865 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 520 | 899 | 907 | 504.556 |
| | 10 | | **HP** | **10** | 685 | 930 | 939 | 664.6555 |
| 30 | Supplying & Erecting Couple | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 370 | 520 | 525 | 359.011 |
| | 2 | | **HP** | **2** | 480 | 575 | 580 | 465.744 |
| | 3 | | **HP** | **3** | 515 | 695 | 701 | 499.7045 |
| | 5 | | **HP** | **5** | 575 | 745 | 752 | 557.9225 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 630 | 825 | 833 | 611.289 |
| | 10 | | **HP** | **10** | 785 | 955 | 964 | 761.6855 |
| 31 | Supplying & Erecting Impler | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 255 | 430 | 434 | 247.4265 |
| | 2 | | **HP** | **2** | 250 | 465 | 469 | 242.575 |
| | 3 | | **HP** | **3** | 320 | 575 | 580 | 310.496 |
| | 5 | | **HP** | **5** | 370 | 585 | 590 | 359.011 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 425 | 595 | 600 | 412.3775 |
| | 10 | | **HP** | **10** | 450 | 620 | 626 | 436.635 |
| 32 | Supplying & Erecting Gude Ven PVC | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 255 | 435 | 439 | 247.4265 |
| | 2 | | **HP** | **2** | 250 | 510 | 515 | 242.575 |
| | 3 | | **HP** | **3** | 375 | 570 | 575 | 363.8625 |
| | 5 | | **HP** | **5** | 420 | 610 | 616 | 407.526 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 513 | 698 | 704 | 497.7639 |
| | 10 | | **HP** | **10** | 462 | 679 | 685 | 448.2786 |
| 33 | Supplying & Erecting Key | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 315 | 545 | 550 | 305.6445 |
| | 2 | | **HP** | **2** | 318 | 525 | 601 | 308.5554 |
| | 3 | | **HP** | **3** | 425 | 625 | 631 | 412.3775 |
| | 5 | | **HP** | **5** | 470 | 655 | 661 | 456.041 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 520 | 725 | 732 | 504.556 |
| | 10 | | **HP** | **10** | 525 | 745 | 752 | 509.4075 |
| 34 | Supplying & Erecting Bearing Housing | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 570 | 810 | 818 | 553.071 |
| | 2 | | **HP** | **2** | 610 | 775 | 782 | 591.883 |
| | 3 | | **HP** | **3** | 655 | 920 | 929 | 635.5465 |
| | 5 | | **HP** | **5** | 835 | 1030 | 1040 | 810.2005 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 755 | 995 | 1004 | 732.5765 |
| | 10 | | **HP** | **10** | 1075 | 1355 | 1368 | 1043.0725 |
| 35 | Supplying & Erecting Roter Sleav | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 285 | 480 | 484 | 276.5355 |
| | 2 | | **HP** | **2** | 365 | 515 | 520 | 354.1595 |
| | 3 | | **HP** | **3** | 415 | 620 | 626 | 402.6745 |
| | 5 | | **HP** | **5** | 450 | 580 | 585 | 436.635 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 485 | 622 | 628 | 470.5955 |
| | 10 | | **HP** | **10** | 515 | 710 | 717 | 499.7045 |
| 36 | Supplying & Erecting Thurst Bearing | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 610 | 798 | 805 | 591.883 |
| | 2 | | **HP** | **2** | 635 | 825 | 833 | 616.1405 |
| | 3 | | **HP** | **3** | 1050 | 1190 | 1201 | 1018.815 |
| | 5 | | **HP** | **5** | 1300 | 1565 | 1580 | 1261.39 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 1650 | 1825 | 1843 | 1600.995 |
| | 10 | | **HP** | **10** | 2300 | 2610 | 2636 | 2231.69 |
| 37 | Supplying & Erecting Bearring Bushes | | | | | | | |
| | 1 | | **HP** | **1** | 690 | 865 | 873 | 669.507 |
| | 2 | | **HP** | **2** | 900 | 1145 | 1156 | 873.27 |
| | 3 | | **HP** | **3** | 1080 | 1275 | 1287 | 1047.924 |
| | 5 | | **HP** | **5** | 1550 | 1899 | 1917 | 1503.965 |
| | 7.5 | | **HP** | **7.5** | 1980 | 2510 | 2535 | 1921.194 |
| | 10 | | **HP** | **10** | 2345 | 2615 | 2641 | 2275.3535 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 38 | Supply & Errecting CAPACITOR | | | | | | | |
| | 1 | | **KVAR** | **1** | 460 | 577 | 582 | 446.338 |
| | 2 | | **KVAR** | **2** | 515 | 625 | 631 | 499.7045 |
| | 3 | | **KVAR** | **3** | 655 | 845 | 853 | 635.5465 |
| | 4 | | **KVAR** | **4** | 750 | 930 | 939 | 727.725 |
| | 25 | | **KVAR** | **25** | 800 | 1000 | 1010 | 776.24 |
| | 36 | | **KVAR** | **36** | 900 | 1120 | 1131 | 873.27 |
| | **TOTAL A =** | | | | **121565** | **143429** | **145280** | **117954.5195** |
| | **Total B (GST 12%) =** | | | | **14588** | **17211.48** | **17434** | **14154.7364** |
| | **Total Amount (A+B) =** | | | | **1,36,153.00** | **160640.48** | **1,62,714** | **132109.256** |

करिता ए.आर. इंजिनीअर्स नांदेड यांचे वरील प्रमाणे वाटाघाटी अंती 2.97% ने कमी केलेल्या दर रुपये 1,32,109/- (अक्षरी रुपये एक लक्ष बत्तरीस हजार एकशे नऊ फक्त) या दरा प्रमाणे वेळोवेळी होणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव व दर मंजुरीस्तव प्रस्ताव संविघा करण्या कामी मा. स्थायी समिती सभे समोर मंजुरीस्तव सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय:-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत कै.वसंतरावजी नाईक यांच्या प्रस्तावीत पुतळयाकरीता आवश्यक मौजे असदुल्लाबाद मधील सर्वे नं.24 (भाग) CTSNo.10446 मधील नागार्जुना टि पॉईंट येथील वखार महामंडळाच्या जागेलगत असलेली 1183.48 चौ.फुट (109.94 चौ.मी) खाजगी जागा हस्तांतर करणे बाबत.

**संदर्भ** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम *76* व *77*

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत कै.वसंतरावजी नाईक यांचा 09 फुटी ब्राझ धातुचा पुर्णाकृती पुतळा हा मौजे असदुल्लाबाद मधील सर्वे नं. 25 मधील वखार महामंडळाच्या 276.88 चौ.मी जागेत उभारण्याचे प्रस्तावीत आहे. तथापी सदर प्रकरणी प्रस्तावीत पुतळयासाठी वखार महामंडळाच्या जागेलगत असलेल्या सर्वे नं.24 (भाग) CTSNo 10446 मधील खाजगी जागेपैकी नागार्जुना टि पॉईंट येथील 1183..48 चौ.फुट (109.94 चौ.मी) अतिरीक्त जागा आवश्यक आहे.

करिता विषयांकीत प्रकरणी उक्त 1183.48 चौ.फुट (109.94 चौ.मी) खाजगी जागा महापालिकेस हस्तांतरीत करणेकरीता तसेच सदर जागेबाबत चालु मुल्यांकनाचे दुप्पट दराने वाटाघाटीअंती निश्चित होणारी रक्कम रुपये 33,42,176/- (तेहत्तीस लक्ष बेचाळीस हजार एकशे शहात्तर रुपये फक्त) जागा मालकास अदा करणे करिता सदरचा प्रस्ताव मंजुरीस्तव येत्या स्थायी समिति सभेसमोर ठेवण्यात यावा.

**विषय क्रं. 06**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी अंतर्गत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणीत्र नियम-2000 व बॉयोमेडीकल वेस्ट मॅनेंजमेन्ट अन्ड हॅन्डलींग रुल्स 1998 व तरतुदीनुसार जैव वैद्यकीय (Bio-medical Waste) कच-याची भस्मीकरण यंत्राव्दारे शास्त्रोक पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी Superb Hygenic Disposal (I) Pvt. Ltd., Nagpur यांची 30 वर्षाकरीता BOT (बांधा वापरा हस्तांतरीत करा) या तत्वावर मनपा सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रं. 167 दिनांक 30.01.2008 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आले आहे.

संबंधीत संस्थेसोबत दिनांक 25.10.2008 रोच्या करारनाम्यातील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन जा.क्रं. नावाशमनपा/आवस्ववि/7609/2008 दिनांक 11.12.2008 रोजीच्या कार्यारंभ आदेश देण्यात आलेली आहे. तथापी, आपत्तीजन्य बाब उदा. कोव्हिड-19 उध्दवलेल्या प्रादुर्भावाच्या परिस्थिती विषयी सदरच्या करारनाम्यात कुठलेली उल्लेख नाही. तरी संबंधीत संस्थेचे विनंतीनुसारशहरातील खाजगी कोव्हिड केअर सेंटरमधून Covid Bio-medical Waste संकलपनाच्या अनुषंगाने आपत्ती विषयक बाब Indian Medical Association व Superb Hygenic Disposal (I) Pvt Ltd., यांनी अतिरिक्त सवाशुल्क आकारण्याबाबत विनंती करण्यात आले आहे.

त्यानुसार सुपर्ब हॉयजेनिक डिस्पोजन (ई) प्रा.लि. यांचे दिनांक 12.08.2021 रोजीच्या विनंती पत्र तसेच Indian Medical Association, नांदेड यांचे दिनांक 30.07.2021 रोजीच्या पत्रानुसार नांदेड शहरांतर्गत खाजगी कोव्हिड केअर सेंटर मधून दैनंदिन संकलन केलेल्या Covid Bio-medical Waste प्रति किलो रुपये 100/- च्या दरास 35% सवलतीच्या दरास उक्त दोघांनी लेखी समंती दिले आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीअंतर्गतखाजगी कोव्हिड केअर सेंटरमधून दैनंदिन निर्माण होणारा Covid Bio-medical Waste संकलन व विल्हेवाटसाठी सेवाशुल्क प्रति किलो रुपये 100/- या दरास 35% सवलत (Discount) या दरा प्रमाणे कोव्हिड-19 च्या दिवसात उपलब्ध अभिलेखाच्या अनुषंगाने दिनांक 01.08.2020 पासून सेवाशुल्क वसुल करण्यासाठी मनपाकेच्या स्थायी समिती सभेत चर्चा करुन मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव सादर.

**विषय क्रं. 07**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शाहु महाराज यांचे पूर्णाकृती पुतळयावर मेटन (ब्राँझ) छत्र (छत्री) बसविणे बाबत.**

संदर्भ :- 1) कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/7027/2021 दिनांक 06.10.2021

2) मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे) मुंबई यांचे पत्र दिनांक 06.10.2021

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शाहु महाराज यांचे पूर्णाकृती पुतळयावर मेटल (ब्राँझ) छत्र (छत्री) बसविणेसाठी मान्यता दिल्यानुसार ई-दरपत्रक सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/4012/2021 दिनांक 26.07.2021 अन्वये दैनिक सामना विभागीय पातळी / दैनिक नगुशे उर्दु या वर्तमान पत्रातुन दिनांक 27.07.2021 रोजी दुस-यांदा ई-दरपत्रक प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 प्राप्त झाल्या त्यापैकी फक्त (02) दरपत्रक पात्र झाल्यानुसार निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 06.09.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे), मुंबई | रु. 13,50,000/- |
| 02 | दिपक थोपटे पुणे | रु. 20,00,000/- |

दरपत्रक तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे) मुंबई यांची असून दर रुपये 13,50,000/- इतके आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संदर्भ क्रं. 02 अन्वये संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीतांनी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून लेखी पत्र देवून सदर दर रुपये 13,50,000/- च्या ऐवजी 9,50,000/- सर्व करांसहित करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे.

करिता **नावाशमनपा हद्दीत छत्रपती शाहु महाराज यांचे पूर्णाकृती पुतळयावर मेटल (ब्राँझ) छत्र (छत्री) बसविणेसाठी मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे) मुंबई यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती रुपये 9,50,000/- दर मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

**विषय क्रं. 08**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील वार्षिक देखभाल दुरुस्ती इमारत दुरुस्ती, शाळा, दवाखाने दुरुस्ती, महापुरुष यांच्या जयंती, पुण्यतिथी, साजरी व इत्यादी कामे करणे.**

**संदर्भ :-** कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/4186/21 दिनांक. 29.07.21 रुपये 01,16,19,941/-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील वार्षिक देखभाल दुरुसती इमारत दुरुस्ती, शाळा, दवाखाने दुरुस्ती, महापुरुष यांच्या जयंती, पुण्यतिथी, साजरी व इत्यादी कामे करणेसाठी संदर्भीय

आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार निविदा किमंत रुपये 01,03,74,590/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/4531/21 दिनांक 06.08.21 अन्वये दैनिक पुण्यनगरी विभागीय पातळी / दैनिक उदयाचा मराठवाडा या वर्तमान पत्रातुन दिनांक 10.08.21 ई-निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण (02) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 23.09.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मुस्तफैंझ अहेमद अल्ताप अ., नांदेड | 11.61% कमी दर |
| 02 | मोहम्मद अजीम अब्दुल अजीज नांदेड | 6.11% कमी दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मुस्तफैंझ अहेमद अल्ताफ अ., नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.61% कमी दराची आहे.

करिता **नावाशमनपा हद्यीतील वार्षिक देखभाल दुरुस्ती इमारत दुरुस्ती, शाळा, दवाखाने दुरुस्त, महापुरुष यांच्या जयंती, पुण्यतिथी, साजरी व इत्यादी कामे करणेसाठी मुस्तफैंझ अहेमद अल्ताफ अ., नांदेड यांची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा 11.61% कमी दर + GST या दराने संविदा करणेकामी मंजुरीस्तव तसेच सदर कामासाठी रुपये 01,16,19,941/- यास अर्थसंकल्प 2021-22 मधील इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातुन काम हाती घेणेस्तव प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

**विषय क्रं. 09**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे मागील भिंतीवर त्यांच्या जिवन चारित्रावरील कलाकृती (म्युरल) FRP मध्ये बसविणे बाबत.

संदर्भ :- 1) कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/7026/2021 दिनांक 06.10.2021

2) मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे) मुंबई यांचे पत्र दि. 06.10.2021

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे मागील भिंतीवर त्यांच्या जिवन चारित्रावारील कलाकृती (म्युरल) FRP मध्ये बसविणेसाठी मान्यता दिल्यानुसार ई-दरपत्रक सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/4530/2021 दिनांक 06.08.2021 अन्वये दैनिक पुण्यनगरी विभागीय पातळी / दैनिक उदयाचा मराठवाडा या वर्तमान पत्रातुन दिनांक 10.08.2021 दुस-यांदा ई-दरपत्रक प्रसिध्द केल्यानुसार एकूण (06) प्राप्त झाल्या त्यापैकी फक्त (03) दरपत्रक पात्र झाल्यानुसार निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 21.09.2021 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे) मुंबई | रुपये 8,75,000/- |
| 02 | व्ही. स्वामी आर्ट नांदेड | रुपये 9,50,400/- |
| 03 | राहुल गणेशराव बावगे नांदेड | रुपये 13,50,000/- |

दरपत्रकाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे) मुंबई यांची असुन दर रुपये 8,75,000/- इतके आहे सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संदर्भ क्रं. 02 अन्वये संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचाचरण केले असता संबंधीतांनी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून लेखीपत्र देवुन सदर दर रुपये 8,75,000/- च्या ऐवजी रुपये 5,00,000/- सर्व करांसहित करण्यास तयार असल्याचे लेखी समंती दिली आहे.

करिता **नावाशमनपा हद्दीत अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे मागील भिंतीवर त्यांच्या जिवन चारित्रावरील कलाकृती (म्युरल) FRP मध्ये बसविणेसाठी मे. सर्कल क्रिएशन अंधेरी (वे) मुंबई यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती रुपये 5,00,000/- दर मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविध विभागासाठी हार्डवेअर/संगणक/ लॅन/सर्वर यांचे देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी अनुभव असणारे खालील व्यक्तीची महापालिकेत संगणक चालकांची व त्यांच्या अनुभव लक्षात घेता सध्या ते विविध विभागात कामही करीत आहे त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 53 मधील तरतुदीनुसार सहानुभुतीच्या व मानवतेच्या दृष्टीकोणातुन प्रथमत: सहा महिण्याच्या कलावधीसाठी नियुक्ती देणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **नांव** | **अनुभव** | **सध्या काम करत असलेले विभागाचे नांव** |
|---|---|---|---|
| 01 | श्री कुलकर्णी अमोल अनिलराव | हार्डवेअर/संगणक हताळणगे/लॅन /सर्वर व मनपाकेच्या प्रशासकिय इमारतीतील सर्व विभाग व क्षेत्रीय कार्यालय येथील संगणकाचे देखभाल व हाताळण्याचे सालसन 2012 ते आज पावेता काम करीत आहे | संगणक विभाग |
| 02 | श्री विजय विठ्ठलराव धुतडे | ई-टेंडरींग/हार्डवेअर/संगणक हताळणे /लॅन /सर्वर व मनपाकेच्या प्रशासकिय इमारतीतील सर्व विभाग व क्षेत्रीय कार्यालय येथील संगणकाचे देखभाल व हाताळण्याचे सालसन 2009 ते आज पावेता काम करीत आहे | संगणक विभाग |
| 03 | श्री जोंधळे रविराज गंगाधर | संगणक चालक असुन त्यांना मालमत्ता कर वसुलीची नोंदीचे परीतपूर्ण अनुभव आहे तसेच बिएसयुपी च्या लाभार्थ्यांचे वसुली ऑनलाईन व्दारे नोंदणी करीत आहे. | बिएसयुपी विभाग |
| 04 | श्री मिर्झा आवेस बेग मिर्झा अर्शद बेग | सालसन 2015 पासुन स्वचछ महाराष्ट्र अभियान (नागरी) विभाग येथे डाटा एंट्री ऑपरेटर म्हणुन काम केरीत आहे. | स्वच्छ महाराष्ट्र अभियान विभाग |
| 05 | श्री शेख जमील अहेमद साब | रमाई आवास योजने अंतर्गत लाभार्थ्यांची ऑनलाईन व्दारे नोंदणी करुन डिपीआर ची कार्यवाही करणे | रमाई आवास योजना विभाग |

करिता वरील बाबी लक्षात घेता तसेच नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेत संगणक चालकांची संगणक चालक म्हणुन प्रथम सहा महिण्यासाठी एकत्रीत वेतनावर/मानधनावर नियुक्ती देण्यासाठी वरील अधिनियमातील तरतुदीनुसार सहानुभुतीच्या व मानवतेच्या दृष्टीकोणातुन नियुक्ती देण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक :-** गजभारे बापुराव **अनुमोदक :-** रेहाना बेगम चाँद पाशा

**विषय क्रं. 11** **अपिल** **दि. 15.11.21 प्राप्त दि. 15.11.21**

**प्रति,**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती,**

**नावाशमनपा नांदेड**

**विषय :-** अवेतनीत कालावधी हा हक्क असलेल्या रजेत समाविष्ठ करणे बाबत.

**महोदय,**

श्री राजहंस गोदाज वाघमारे पुरुष मजुर हे अनुपस्थित राहील्यामुळे वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे माझी दिनांक 04.10.11 ते 23.05.12 या कालावधीत निलंबीत करण्यात आले होते. निलंबन प्रकरणी कार्यालयीन आदेश क्रं.नावाशमनपा/आस्था-8/8393/ दिनांक 08.02.13 व्दारे माझा दिनांक 04.10.11 ते 23.05.12 हा निलंबन कालावधीत अवेतनीत करुन माझा एक वार्षीक वेतनवाढ गोठवण्यात आली होती.

तथापि मी हे पुरुष मजुर असून 08.02.13 तदनंतर ते आजपावेतो अंदाजे 09 वर्षाच्या कालवधीत माझ्या सेवाकालावधी बाबत सुधारणा झालेली निलंबन काळ हा अवेतनीक करण्यात येऊन त्यांची एक वेतनवाढ गोठविण्यात आली. त्यामुळे माझा एकाच वेळी एकाच आदेशाव्दारे दोन शिक्षा देण्यात आल्या.

करिता या प्रकरणी माझा दिनांक 04.10.11 ते 23.05.12 हा कालावधीत अवेतनीत ठेवुन महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदीनुसार माझा झालेली सेवेतील सुधारणा विचारात घेता संबंधीताचा अवेतनीत कालावधीत उक्त दिनांकास माझा हक्क असलेल्या रजेत समाविष्ठ करुन उर्वरीत कालावधी हा अवेतनीत करण्यात याव्या व माझी एक गोठवलेली सामान्य वेतनवाढ नियमीत करण्यास हि विनंती.

**आपला विश्वासु,**
**स्वाक्षरीत/-**
**राजहंस गोदाजी वाघमारे**
**पुरुष मजुर मनपा नांदेड**

**विषय क्रं. 12** **अपिल** **दि. 15.11.21 प्राप्त दि. 15.11.21**

**प्रति,**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती नावाशमनपा नांदेड**

**विषय :- तात्पुरती सेवा कालबध्द पदोन्नती/आश्वाशीत प्रगती योजनेच्या लाभ मिळणे बाबत शासनास शिफारस करणे बाबत**

**महोदय,**

दिनांक 26 मार्च 1997 रोजी नांदेड व वाघाळा या दोन नगरपालिकेचे एकत्रीकरण करुन त्यामध्ये महसुली गावाचा समावेश करण्यात आलेला आहे. यानुसार सांगवी बु. या ग्रामपंचायतकडील विठठल बालाजीराव तिडके म्हणजे मी शासनाचे 07 मार्च 2001 च्या मान्यतेनुसार लिपीक पदावर सेवेत सामावुन घेण्यात आले आहे.

करिता माझी दिनांक 26 मार्च 1997 ते 07 मार्च 2001 हा तात्पुरता सेवेचा कालावधी कालबध्द पदोन्नती/ सेवाअंतर्गत आश्वाशीत योजनेच्या प्रयोजनासाठी विचारात घेण्याबाबत शासनाकडील वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं. मप्रन्या/2012/प्र.क्र.69/2012 सेवा-3 दिनांक 07 ऑक्टोंबर 2016 च्या

शासन निर्णयातील तरतुदीनुसार गृहीत धरण्याबाबत आवश्यकतो प्रस्ताव शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात यावी ही विनंती.

**आपला विश्वासु**

**स्वाक्षरीत/-**

**विठ्ठल बालाजीराव तिडके, लिपीक मनपा नांदेड**

**विषय क्रं. 13 अपिल दिनांक 11.10.2021**

**प्रति,**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**विषय** :- वार्षिक वेतनवाढ सुरु करणे बाबत

संदर्भ :- जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/6162/21 दि. 14.09.2021

**महोदय,**

वरील विषयी विनंती की मला संदर्भीय आदेशान्वये एक वार्षीक वेतनवाढ कायमस्वरुपी गोठवून विभागीय चौकशीच्या अधिन राहुन कामावर पुनस्थापीत करण्यात आले त्या अनुषंगाने मी शिक्षण महिला व बालकल्याण समिती कक्ष विभागात रुजु झालो आहे.

माझ्या घरची परिस्थिती गरीबीची असून घरात दुसरा कमवता व्यक्ती नसल्यामुळे सर्व जबाबदारी माझ्यावर आहे माझी संदर्भीय आदेशान्वये कायमस्वरुपी गोठवलेली वार्षीक वेतनवाढ पुर्ववत सुरु करावी जेणे करुन माझ्यावर आर्थीक संकट कोसळणार नाही यापुढे मी प्रमाणिकपणे माझी नौकरी करीन हि नम्र विनंती.

**आपला विश्वासु,**

**स्वाक्षरीत/-**

**नितीन शंकरराव पवार**

**(शिपाई) शिक्षण महिला व बालकल्याण समिती कक्ष,**

**नावाशमनपा नांदेड**

**विषय क्रं. 14 अपिल दिनांक 28.10.2021 प्राप्त दि. 11.11.21**

**प्रति,**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती मनपा नांदेड**

**विषय :-** सब फायर ऑफीसर या पदावर पदोन्नती पासून वंचित ठेवल्या बाबत

**महोदय,**

वरील विषयास अनुसरुन आणास विनंती करण्यात येते की, माझी नियुक्ती भुतपूर्व नगरपालिका नांदेड या कार्यालयात दि. 1989 रोजी फायरमन या पदावर सरळ सेवा प्रवेशाने झाली आहे. तदनंतर सेवाजेश्ठता, अनुभव, गोपनिय अहवाल याचा विचार करुन मला 2006 मध्ये लिडींग फायरमन या पदावर पदोन्नती देण्यात आली. तदनंतर मी वरील पदावर पदोन्नतीसाठी पात्र असल्यामुळे लिडींग फायरमन या पदावरुन सब फायर ऑफीसर या पदावर पदोन्नतीसाठी सेवाजेष्ठता, अनुभव, गोपनिय अहवाल ई. बाबींचा विचार करुन मुं.प्रा.अ. 1949 चे कलम 54 मधील तरतुदीनुसार निवड समितीने सब फायर ऑफीसर या पदावर पदोन्नतीसाठी दि. 01.08.2009 रोजी निवड केली मी अनेक वेळा निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती मिळावी म्हणून अर्ज केले परंतु माझा एकाही अर्जाचा आजपावेतो विचार करण्यात आला नाही.

मी नाराजीने प्रकरण 2012 मध्ये माझे पदोन्नतीचे प्रकरण औद्यागीक न्यायालय जालना येथे न्याय प्रविष्ठ केले सन्माननीय न्यायालयाने दि. 06.10.2015 रोजी माझ्या बाजुने निर्णय दिला. मनपा प्रशासनाने सदर आदेशा विरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अपिल दाखल केले. मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी दि. 04.12.2015 रोजी माझ्या बाजुने निर्णय दिला. असे असतांना देखील माझ्या पदोन्नतीचे आदेश निर्गमीत केले गेले नाही. तदनंतर मी प्रधान सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई येथे दि. 19.10.2018 रोजी तक्रार सादर केली. सदर तक्रारीचे उत्तरी नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक 02.05.2019 रोजी आयुक्त मनपा यांना कळवुन एका आठवडयाचे आत निर्णय घेवून शासनास अवगत करावे असे कळविले. तथापी सदर पत्रास सुध्दा केराची टोपली दाखविण्यात आली.

मा. महोदयांच्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की महाराष्ट्र शासन महाराष्ट्र अग्नीशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र अग्नीशन सेवा अकादमी यांनी जारी केलेल्या सेवा प्रवेशाच्या नियमातील तरतुदीनुसार लिडींग फायरमन या पदावरुन सब फायर ऑफीसर या पदावर पदोन्नती देतांना केवळ खालच्या पदाच्या अनुभवाची आवश्यक्ता आहे. प्रशिक्षणाची आवश्क्ता नाही. असे असतांना देखील याह बाबीकडे मनपा प्रशासन जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहे व मला पदोन्नती पासून वंचित ठेवत आहे.

मा. महोदय आपल्या निदर्शनास हे की, आणुन देऊ इच्छितो की, श्री रईस पाशा यांची मुळ नेमणुक शिपाई पदावरची आहे. शिपाई पदावरुन त्यांना फायरमन या पदावर बेकायदेशीर पदोन्नती देण्यात आली. पदोन्नती देतांना प्रकरण निवड समिती समोर ठेवण्यात आले नाही. परस्पर बेकायदेशीर पदोन्नती देण्यात आली आहे. तदनंतर फायरमन या पदावरुन थेट सब फायर ऑफीसर पदोन्नती देण्यात आले आहे. विशेष माझ्जे सब फायर ऑफीसर या पदावर पदोन्नती देण्याचे प्रकरण औद्योगीक न्यायालय जालना येथे न्याय प्रविष्ठ असतांना पदोन्नती देण्यात आली आहे. एखादे प्रकरण न्याय प्रविष्ठ असतांना न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत सदरचे पद भरता येत नाही. परंतु हाही नियम डावलुन श्री रईस पाशा यांना जंपींग पदोन्नती दिली आहे.

अग्नीशमन विभागात पदोन्नतीची साखळी फायरमन-लिडींग फायरमन-सब फायर ऑफिसर-फायर ऑफीसर अशी आहे. श्री पाशा फायरमन पदावर बेकायदेशीर होते त्यांना थेट सबफायर ऑफिसर या पदावर ते माझ्या पेक्षा कनिष्ठ असतांना मला डावलुन त्यांना नियमबाहय बेकायदेशीर जंपींग पदोन्नती दिली आहे ती पदोन्नती रद्द करुन न्यायालयाच्या निर्णया प्रमाणे मला सब फायर ऑफिसर पदावर पदोन्नती देण्यात यावी.

मी मागासवर्गी असल्यामुळे माझ्या कोणत्याही अर्जाचार विचार करीत नाहीत किंवा सादरीकरण करत नाहीत. तेंव्हा मा. महोदयांनी विनंती करण्यात येते की माझे अपील मान्य करावे अशी विनंती आहे तसेच मला सब फायर ऑफीसर या पदावर पदोन्नती देणे संबंधी मा. आयुक्त यांना निर्देश दयावेत अशी विनंती आहे.

**आपला विश्वासु**
**स्वाक्षरीत/-**
**केरोजी सिताराम दासरे**
**लिडींग फायरमन**
**अग्निशमन विभाग, मनपा नांदेड**

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**( गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ )**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.